## बीड च्या मानसी मनोज काळे चे अबॅकस परीक्षेत घवघवीत यश




**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथे झालेल्या जी चॅम्प अबॅकस संचलित गणेश काळे क्रीडांगण मंच स्वारगेट पुणे या ठिकाणी १५ डिसेंबर २०२४ रविवार जी – चॅम्प नॅशनल लेवल स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती या स्पर्धेत देशभरात सुमारे सुमारे ५००० विद्यार्थ्यांच्या सहभाग झालेला होता. यामध्ये निक कोचिंग क्लासेस स्वराज्य नगर बीड येथील मानसी मनोज काळे हीने ४ींह लेवल मध्ये सुपरस्टार बक्षीस मिळवले.

विद्यार्थ्यांच्या यशाच्या मागे जी – चॅम्प अबॅकस

क्लासेसच्या संचालिका सौ. जया तिरगुळ मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरले. तसेच क्लासेसचे यश पाहून जया तिळगुळ मॅडम यांना नॅशनल लेवल बेस्ट टीचर व बेस्ट फेंचाइसी प्रथम क्रमांकाने (पुणे) गौरवण्यात आले. मुलांच्या व क्लासेच्या यशाच्या मागे शिक्षक स्टाफचाही मोलाचा वाटा आहे. यामध्ये सो.जयश्री जाधव मॅडम, कु. कुणीका फाटक मॅडम, सौ पल्लवी निकाळजे मॅडम, यांनीही मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या स्पर्धेचे आयोजन पुणे येथे जी – चॅम्प अबॅकस चे डायरेक्टर श्री. योगेश देशमाने सर व सौ. आरती देशमाने मॅडम यांच्या म ार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# मुप्टाचे क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ घोषित

## पुरस्कार वितरण सोहळा २९ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न होणार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनच्या (मुप्टा) वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२४ च्या क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा जाहीर करण्यात आली असून बीड जिल्हा मुप्टाचे जिल्हाध्यक्ष मा. प्रा. प्रदीप रोडे यांच्या अध्यक्षतेखाली तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड.येथे बैठक संपन्न झाली.

बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सर्व समावेशक कृतिशील कर्तृत्व करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात येतो. प्रति वर्षी प्रमाणे यावर्षी चे पुरस्कार वितरणाचे १६ वे वर्ष आहे असे पुरस्कार वितरण सोहळ्याचे मुख्य संयोजक व बीड जिल्हा मुप्टाचे अध्यक्ष, प्रा. प्रदीप रोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. शिक्षक प्राध्यापकांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव लढाऊ संघटना म्हणून मुप्टाने आपली ओळख निर्माण केलेली आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून संघटनेने सामाजिक बांधिलकी जोपासलेली आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या संदर्भात त्यांना हवे त्या मदतीचे कार्य करून जणूकाही शैक्षणिक नवक्रांती करण्याचे कार्य मागील अनेक वर्षापासून बीड जिल्हा मुप्टा करते आहे. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने सलग १६ व्या वर्षी शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड. येथे सकाळी ठीक १० वाजता संपन्न होणार आहे.

पुरस्कारार्थी– १. प्रा. डॉ. प्रतिभा जाधव, (आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लासलगाव,जिल्हा नाशिक.) २. प्राचार्य भास्कर पाटील,( सुधाकरराव नाईक महाविद्यालय, अकोला.) ३. श्रीमती कीर्तीताई श्रीधरराव पांगरकर (साळुंके), (विनायक प्राथमिक विद्यालय, बीड.) ४. आयु. राहुल कांबळे, (युसुफ वडगाव हायस्कूल, युसुफ वडगाव, ता. केज जि. बीड.) ५. आयु. जालिंदर ठवरे, (जि. प. प्राथमिक शाळा,रेवकी ता.गेवराई जि. बीड.) ६. आयु. संजय कांबळे, (लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि. जालना.) ७. प्राचार्य,संघमित्रा गोणारकर, (सावित्रीबाई फुले महिला बी.एड. कॉलेज,नांदेड.) ८. श्रीमती भावसार अश्विनी रामराव, ( जि. प. प्राथमिक शाळा वाणीसंगम, जि. परभणी.) ९. आयु. वडमारे सचिन, (भगवान विद्यालय,बीड.) १०. आयु. गायकवाड दादासाहेब, (विवेकानंद विद्यालय,केज. जि. बीड.) ११. आयु. शामसुंदर बगाटे, (जि. प. प्राथमिक शाळा,लोणी, जि. परभणी.) १२. आयु.भादवे सुभाष, ( जि. प. प्राथमिक शाळा, केरूळ, ता. आष्टी जि. बीड.) १३. श्रीमती रेणुका मुक्ताराम दोडके, (जि. प. प्राथमिक शाळा, थेरला, ता. पाटोदा जि. बीड.) १४. प्रा. डॉ. अनिता शिंदे, ( सौ.के. एस. के. महाविद्यालय, बीड.) १५. आयु. गणेश मैंद, (विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय, जोडबोडसर, जि.छ. संभाजीनगर.) १६. हेमलता सुनील गजबे, (एम.एस.सी. नर्सिंग कॉलेज,जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.) तरी या पुरस्कार सोहळ्यासाठी शिक्षणप्रेमी आणि समाजातील सर्वच घटकांनी व पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा मुप्टा संयोजन समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.



*बीड: संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृतिदिना निमित्त शुक्रवार (२० डिसेंबर) रोजी बीड येथील महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी ९ वाजता शहरातील संत गाडेबाबा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी अभिवादन ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते.*

## रेल्वे पुलाच्या कामासाठी वळण रस्ता २० दिवस बंद

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरानजिक रेल्वे पूलाचे काम सुरु असल्याने मार्गालगत असणारा वळण रस्ता बंद करण्यात येणार असून वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या कपिल मुनी मंदिर पासून ज्या मार्गाने बीड रोड ओलांडून वाहने सध्याच्या वळण रस्त्याने जातात त्या रेल्वेमार्गालगतच्या वळण रस्त्यावर वाहतूक पुढील १५ ते २० दिवस बंद राहणार आहे, असे रेल्वेतर्फे जारी एका प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या वतीने आम्रपाली साबळे उत्कृष्ट अभिनयासाठी सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाने पार पडली,राज्य नाट्य स्पर्धेत बीड व संभाजी नगर केंद्रावर बीड जिल्हा ,धाराशिव जिल्हा ,जालना जिल्हा आणि संभाजी नगर जिल्हा मिळून असे एक केंद्रात साधरील स्पर्धा दिनांक २५ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर क्या दरम्यान अतिशय आनंदी व जल्लोषात पार पडली आहे .सदरील स्पर्धेत चार जिल्ह्यातून एकूण सोळा नाटके सादर झाली आहेत ,त्यात बीड येथील न्यू प्रगती महिला सेवा भावी संस्था च्या वतीने डॉ. आरुण जऱ्हाड



लिखित व प्राध्यापक विनोद दळवी दिग्दर्शित द अँनॉमली हे नाटक सादर करण्यात आले होते

सदरील नाटकाने रसिक मायबाप प्रेक्षकाची मने जिंकल्या मुळे रसिक प्रेक्षकांनी नाटकास टाळ्यांच्या गजरात नाट्य गृहातील सर्व प्रेक्षक नाटकाशी एकरूप होऊन नाटकातील कलाकारांच्या सादरीकरणाला दाद देत होते. सदरील नाटकात आम्रपाली साबळे यांनी सुचिता नावाची आईची भूमिका साकारली होती,आम्रपाली यांनी रंगमंचावर सुचिता ची भूमिका साकारत असताना प्रेक्षा गृहातील प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते व टाळ्यांचा गजर नाट्य गृहात दुमदुमला होता ,त्यामुळे आम्रपाली साबळे यांना ६३ वी हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील उत्कृष्ट अभिनयासाठी विशेष गुणवत्ता प्रमाण पात्र देवून सन्मानित करण्यात आलं.

सदरील नाटकाचे लेखन डॉ. आरुण जऱ्हाड यांनी केले असून नाटकाचे दिग्दर्शन विनोद दळवी यांनी केलेले आहे. या नाटकात सोनल टाक यांनी नर्स १ ची भूमिका तर दादासाहेब नवघरे यांनी डॉक्टर ची भूमिका सावन गिल यांनी सुधीर , आई – सुनीता नागरगोजे ,बाबा– श्याम टल्ले, बाल कलाकार बेबी एक च्या भूमिकेत कुमारी प्रांजल टाक, बेबी दोन – कुं. श्वेता औसरमोल,बेबी तीन कुमारी कीर्ती शिंदे, जावई – निखिल इच्के, सासू – हिरे मॅडम , सलमान – आमोल गायकवाड, इम्रान – आशोक घुळे, महिला पोलिस – सारिका गायकवाड, इन्स्पेक्टर – राजेंद्र जोसेफ यांनी उत्कृष भूमिका साकारून बीड च्या नाट्य प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मनावर आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एन. निकम, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३१९/२०२४**

**नवनाथ व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत :– ॲड. डी. एम. रोटे**

अर्जदार :–१. नवनाथ पि. किसन बांगर, वय ७५ वर्षे, धंदा शेती, २. रघुनाथ पि. किसन बांगर, वय ७९ वर्षे, धंदा शेती, ३. भगवान पि. किसन बांगर, वय ८३ वर्षे, धंदा शेती, तिघे रा. वाघीरा, ता. पाटोदा, जि. बीड. ४. सिंधुबाई भ्र. रावसाहेब चौरे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, ५. गंगुबाई भ्र. भगवान चौरे, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, दोघी रा. जिवाचीवाडी, ता. केज, जि. बीड. ६. इंद्रायणी भ्र. रावसाहेब मुंडे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. गोविंदवाडी, ता. माजलगांव, जि. बीड. ७. चंद्रभागा भ्र. गोपिनाथ चौरे, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. जिवाचीवाडी, ता. केज, जि. बीड.

विरूध्द निरंक

**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

.वरील अर्जदार क्र. १ ते ७ यांनी या न्यायालयात मयत कलावती भ्र. किसन बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी कलावती भ्र. किसन बांगर यांचा मृत्यु दिनांक ३१/०१/२०१३ रोजी वाघीरा, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे मुले असुन अर्जदार क. ४ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कलावती भ्र. किसन बांगर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ माहे ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७ नोव्हेंबर २०२४.**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**श्री. व्ही.सी. जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १६३/२०२४.**

**ॲड. वाय. आर. शेळके यांच्या मार्फत**

**संगिता पांडुरंग आबुज वि. निरंक**

ज्यापेक्षा **पांडुरंग पि.आत्माराम आबुज** हे दिनांक ०९/०३/२०२२ रोजी रंजेगाव ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१. संगिता भ्र. पांडुरंग आबुज, वय–५० वर्षे, धंदा घरकाम रा.रंजेगाव, ता.जि.बीड, २. माऊली पि.पांडुरंग आबुज, वय–१६ वर्षे, धंदा : शिक्षण रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३. आदिनाथ पि.पांडुरंग आबुज, वय : ८ वर्ष, धंदा : शिक्षण, रा.सदर. अ.पा.क. आई अर्जदार कं १, ४. भाग्यश्री पि. पांडुरंग आबुज वय : २० वर्ष, धंदा : घरकाम, रा. सदर, ५. अश्विनी भ्र. अनंता चव्हाण वय : २२ वर्ष, धंदा : घरकाम रा.नाथापुर ता.जि.बीड

अर्जदार क्र १ ही मयत **पांडुरंग पि.आत्माराम आबुज** यांची पत्नी आहे. अर्जदार क्रं २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार कं. ४ ही मुलगी असुन अर्जदार कं ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत **पांडुरंग पि. आत्माराम आबुज** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १०/०४/२०२४ आहे. **आज दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग / जन्म नोंद/सं. नो.– १५९,**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म–मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार **नामे हनुमंत मनोहर राकुसले, रा. खंडोबाची वाडी तहत खडकी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांची मुलगी नामे स्वाती हनुमंत राकुसले यांचा जन्म दिनांक ०२/०५/२००७रोजी खंडोबाची वाडी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद ग्रामपंचायत खडकी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार वडवणी**

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो. १९४,**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म–मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **हारुन पि. इसाक कुरेशी, रा. खाटीक गल्ली वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे आमेद हारुन कुरेशी याचा जन्म दिनांक २१/०३/१९९३ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार वडवणी**

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र.२०२४/दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो.– २०३,**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म–मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **विमल भ्र.बाबासाहेब होंडे, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे समाधान बाबासाहेब होंडे याचा जन्म दिनांक १२/०७/२००६ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार वडवणी**

## जाहीरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय वडवणी जि.बीड**

**जा.क्र. २०२४ / दंड विभाग/जन्म नोंद/सं. नो.– २१५,**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

**जन्म–मृत्यु नोदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, अर्जदार नामे **लहू पि. अभिमन्यू मुंडे, रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड** यांनी त्यांचा मुलगा नामे सोमनाथ लहू मुंडे याचा जन्म दिनांक १०.१०.२००७ रोजी वडवणी, ता. वडवणी, जि. बीड येथे राहत्या घरी झाला असुन अर्जदार यांनी सदर जन्माची नोंद नगरपंचायत वडवणी, ता. वडवणी, बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची जन्मतारीख व जन्मठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदर कार्यालय अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद जन्मतारीख व जन्मठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत त्यानुषंगाने विहित कार्यवाही करण्यात येईल.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**(स्वाक्षरीत)**
शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार वडवणी**

# भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी संसदेमध्ये अपशब्द वापरणाऱ्या अमित शहा विरोधात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भारताच्या संसदेत अपशब्द वापरणाऱ्या देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करून आमीत शहाचा जाहीर निषेध करण्यात आला.

शिवसेना पक्षप्रमुख सन्मानीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब ,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब, सह संपर्कप्रमुख डॉ. लक्षराज सानप साहेब, सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली




केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी संसदेत अपशब्द वापरल्या मुळे आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने डोक्याला काळ्या फिती बांधून व काळे झेंडे दाखवून केंद्रीय गृहमंत्र्यांचा निषेध असो असा घोषणा देत केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांचा निषेध करण्यात आला.

भारत देशाच्या पवित्र संसदेमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भाजपचे गृहमंत्री अमित शहा यांनी बेताल वक्तव्य केले त्या वक्तव्याचा बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करतो. या देशांमध्ये व महाराष्ट्रामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कोणी अपशब्द वापरत असतील तर बीड जिल्ह्यातील शिवसेना व राज्यातील शिवसेना कदापी सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनी सांगितले. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले, तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, जिल्हासंघटक नितिन भैय्या धांडे, जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत, शिरूर तालुकाप्रमुख सोपानकाका मोरे, अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष नय्युम भाई, कामगार नेते रवि आण्णा वाघमारे, महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटक मीराताई नवले, उपतालुकाप्रमुख प्रकाश धुताडमल, तालुका संघटक विशाल सोनवणे, युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, शिरूर युवाधिकारी साईनाथ ढाकणे, युवा अधिकारी वडवणी नवनाथ मोरे,युवा अधिकारी आष्टी शिवप्रसाद जाधव,युवासेनेचे उपजिल्हाधिकारी ऋषीराज गिरी, गटप्रमुख रामदास मोहिते, माजी सरपंच सखाराम मोहिते, विनोद गुंड पाटील , दीपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड, अक्षयजी काळे, भिमराव कुटे, दत्ता सुरवसे, बाबु कुटे, राहुल काळे, यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## शेतकऱ्यांच्या हक्क व न्यायासाठी नागपूर अधिवेशनावर धरणे आंदोलन व विधान भवनात मंत्री अतुल सावे यांना निवेदन

**नागपूर । प्रतिनिधी**

गेले कित्येक वर्षापासून आसमानी आणि सुलतानी संकटाचा सामना शेतकरी करीत आहे.परंतु सत्तेतील भाजपा सरकार शेतकऱ्यांच्या मागण्याकडे सतत दुर्लक्ष करीत आहे. सोयाबीन ,कापूस या पिकाचे शेतीमालाचे भाव कमी मिळत असल्यामुळे अतोनात शेतकऱ्यांचे नुकसान झाले . शेतकरी संघटना ही गेल्या ४० वर्षापासून शासनाचे विरुद्ध सतत आंदोलन करीत आलेली आहे . परंतु शेतकऱ्यांच्या मागण्याकडे आतापर्यंतचे कोणत्याही सरकारने दखल घेतली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विदर्भ, मराठवाडा पश्चिम महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारत देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सतत वाढत आहे. आणि होत असलेल्या आत्महत्येला राज्य व केंद्र सरकारची धोरणे जबाबदार आहे. आयात- निर्यात धोरणे शेतकऱ्यांच्या बाजूने न घेता भांडवल दारांच्या बाजूने घेतल्या जात असल्यामुळे शेतकरी संपविण्याचे कटकारस्थान रचल्या जात आहे. तसेच नाशिक येथील ५६००० शेतकरी नाशिक जिल्हा को ओप. बँकेचे थकबाकीदार असून शेतकरी कर्जमुक्त करावा.



शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघाचे अध्यक्ष श्री धनंजय पाटील काकडे (ज्येष्ठ साहित्यिक व सरसेनापती)व शेतकरी संघटना समन्वय समितीचे अध्यक्ष श्री भगवानजी बोराडे यांच्या नेतृत्वात हिवाळी अधिवेशन, यशवंत स्टेडियम नागपूर, येथे शेतकरी कर्जमुक्तीसाठी, व शेतीमालाचे रास्त भावासाठी धरणे आंदोलन दि.१७ व १८ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले. तसेच १ जून २०२३ पासून सिविल हॉस्पिटल नाशिक येथे सुद्धा शेतकऱ्यांचे धरणे आंदोलने चालू आहे.

मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेले श्री सावे साहेब यांनी , मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाल्यानंतर मुख्यमंत्र्यां सोबत चर्चा करून बैठक बोलावण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच नवनियुक्त मंत्री महोदय यांच्या रविभवन येथील बंगल्यावर जाऊन दादासाहेब भुसे, श्री माणिकराव कोकाटे, श्री नरहरी झीरवळ साहेब, यांच्या सुद्धा दिनांक १७ डिसेंबर २०२४ ला सदिच्छा भेट घेतली . तसेच निवेदन देतेवेळी सर्वश्री शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे,श्री भगवान भाऊ बोराडे, कैलास भाऊ बोरसे नाशिक, विश्वबंधु महाराज गुरुदेव प्रचारक पुसद, नामदेवराव सोमासे येवला, नाशिक इत्यादी मंडळी निवेदन देतेवेळी हजर होती.

तसेच या कार्यक्रमात महिला आघाडीने यशवंत स्टेडियम येथे आंदोलन स्थळी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. या धरणे आंदोलनात ,श्री दीपक पाटील कथे ,बाळासाहेब मेटकर , हिम्मतराव भूगुल, रंगराव भाऊ लांबटकर , सारिकाताई तीमांडे तरोडा ( सेवाग्राम वर्धा), रेखाताई निमजे नागपूर, गजूभाऊ लेंडे सेवाग्राम , अर्जुन भाऊ तिमांडे , कल्पनाताई लांडगे( तरोडा ), मनीषा ताई तीमंडे (तरोडा ), विद्याताई वाघमारे (तरोडा) अनामिकाताई गुंबळे वायगाव , अनिलभाऊ श्रावने ( वायगाव) कल्पनाताई श्रावने वायगाव जिल्हा वर्धा, सरिताताई श्रावने (वायगाव ), इत्यादी अमरावती, सेवाग्राम ,वर्धा, नाशिक, वैजापूर, येवला व नागपूर येथील कार्यकर्ते व महिला उपस्थित होते. या सर्व कार्यकर्त्यांना आंदोलन स्थळी यशवंत स्टेडियम वरून विधान भवन पर्यंत पोलीस व्हॅन मध्ये नेण्यात आले.

---

## सरपंच संतोष देशमुख हत्याकांड; वंचितकडून कुटुंबीयांचे सांत्वन

### वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे नऊ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. आज वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र केंद्रीय व प्रदेश पदाधिकारी यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच वंचित बहुजन आघाडी आपल्या पाठीशी असल्याचे सांगितले याप्रसंगी राज्याचे नेते व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

## संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी : डॉ ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रकरणांमध्ये राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी सदनांमध्ये उत्तर देत असताना संबंधित आरोपी विरुद्ध मोक्का लावण्याची केलेली घोषणा तसेच एसआयटी व न्यायालयीन चौकशीची केलेली घोषणा महाराष्ट्राच्या गृहमंत्री या नात्याने त्यांच्या संवेदनशीलतेचे प्रतिक आहे. कुटुंबीयांना त्यांनी आर्थिक मदत देखील जाहीर केलेली आहे. याकरिता राज्याच्या मुख्यमंत्र्याचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी संतोष देशमुख



यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी अशी मागणी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. संतोष देशमुख यांच्या निधनानंतर देशमुख कुटुंबियांचा करता आणि कमविता घरातील व्यक्ती गेला आहे त्यामुळे या कुटुंबाच्या पुढील जीवनात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत देशमुख कुटुंब पूर्णपणे संतोष देशमुख यांच्यावर अवलंबून होते त्यांच्या जाण्याने आता त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न देखील उभा राहिला आहे. त्यामळे संतोष देशमुख यांच्या मुलांचे शैक्षणिक खर्चासाठी तरतुदी करिता शासनाकडून विशेष बाब म्हणून त्यांचे शैक्षणिक शुल्क अदा करणे तसेच अनुषंगिक खर्च देण्याबाबत विचार करण्यात यावा अशी मागणी डॉ. ज्योती मेटे यांनी केले आहे.

---

## लिंबागणेश येथे अमित शहांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल असंविधानिक वक्तव्याचा निषेध



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवार रोजी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात राज्यसभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याची फॅशन झाली आहे. आंबेडकरांच्या ऐवजी देवाचे नाव घेतले असते तर सात जन्म स्वर्गात जागा मिळाली असती अशा प्रकारे असंविधानिक वक्तव्य करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला असुन यामुळे महमानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुयायांच्या भावना दुखावल्या असुन याचा निषेध करण्यासाठी आज दि.१९ गुरुवार रोजी लिंबागणेश येथील आंबेडकर समर्थकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा हातात घेऊन गावातुन फेरी काढत डॉ . बाबासाहेब आंबेडकर फॅशन नाही तर पशन आहे अमित शहा माफी मागा अमित शहा राजीनामा द्या देश संविधानसे चलेगा एकच साहेब बाबासाहेबघोषणा दिल्या. यावेळी डॉ . गणेश ढवळे,उ पसरपंच बाळकृष्ण थोरात, आदी उपस्थित होते.

---



# लोखंडीसावरगावच्या रुग्णालयास मशिनरी खरेदीसाठी ४१ लाख १२ हजारांचा निधी मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडीसावरगाव येथील वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्रास नेत्र शस्त्रक्रिया करण्यासाठी मशिनरी खरेदीसाठी ४१ लाख ९२ हजारांचा निधी मंजूर आरोग्य विभागाच्या वतीने मंजूर झाला आहे. ही नवीन मशिनरी उपलब्ध झाल्यास रुग्णालयात नेत्र शस्त्रक्रिया होण्यास गती मिळणार आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी यासाठी पाठपुरावा केला होता.

अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडीसावरगाव) येथे आरोग्य विभागाचे मोठे रुग्णालय आहे. या रुग्णालयात वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र व महिला रुग्णालय व सर्व रोग निदान व उपचार केंद्र कार्यरत आहे. यात जेष्ठ नागरिकांसाठी असलेल्या वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांना सर्व सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. जेष्ठ नागरिकांची महत्वाची समस्या असलेल्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री उपलब्ध नसल्याने या शस्त्रक्रिया रखडल्या होत्या. याबाबत आ. नमिता मुंदडा यांनी राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यामुळे निधी मंजूर होण्यासाठी मोठी मदत झाली. यामुळे आता नेत्र शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी शासनाने परवानगी दिली आहे.व व ही नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी ४१ लाख ९२ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आता रुग्णालय प्रशासन शासनाच्या निर्देशनुसार ही यंत्र सामुग्री खरेदी करणार आहे. हा निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल आ.नमिता मुंदडा यांनी मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री मा एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री मा अजितदादा पवार,मंत्री मा आ पंकजाताई मुंडे याचे आभार मानले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या आरोग्यमंत्री असताना स्व.डॉ. विमलताई मुंदडा यांनी लोखंडी सावरगाव येथे हे रुग्णालय उभे केले होते. त्यामुळे कोरोना काळात ही रुग्णालयाची इमारत अनेकांना जीवदान देणारी ठरली. आता या इमारतीत रुग्णसेवा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभाग कार्यान्वित झाले आहेत. या माध्यमातून या रुग्णालयात रुग्णसेवा गतिमान होऊ लागली आहे.


